**प्रेस नोट** **दि.१०/११/२०२१**

## ट्विटर वर आक्षेपार्ह मजकुर प्रसारीत करणा-या इसमास पश्चिम प्रादेशिक सायबर पोलीस ठाणे यांनी शिताफिने ताब्यात घेतलेबाबत

| | | | |
|---|---|---|---|
| १ | पोलीस ठाणे | : | पश्चिम विभाग सायबर पोलीस ठाणे, बांद्रा पु. मुंबई. |
| २ | गु.र.क्र. व कलम | : | गु.र.क्र. ४९/२०२१, कलम ३५४(अ),५०६,५०० भा.दं.वि. सह कलम ६७, ६७(ब) माहिती तंत्रज्ञान कायदा. |
| ३ | गुन्हा घडला दिनांक/वेळ | : | दिनांक २४/१०/२०२१ रोजी |
| ४ | गुन्हा नोंद दिनांक/वेळ | : | दिनांक ०८/११/२०२१ रोजी १९.२० वाजता |
| ५ | गुन्हा घडल्याचे ठिकाण | : | इंटरनेटवरून |
| ६ | निष्पन्न आरोपी | : | अकुबथिनी रामनागेश, वय २३ वर्षे, रा.ठि. संगारेड्डी, हैद्राबाद. |
| ७ | तपासी अधिकारी | : | पोनि मंगेश मजगर<br>पोउनि विजय वगरे |

**गुन्हयाची थोडक्यात हकीकत.** - भारतीय टिमचा कर्णधार विराट कोहली यांनी प्राधिकृत केल्यानुसार त्यांची मॅनेजर यांनी पश्चिम प्रादेशिक सायबर पोलीस ठाणे येथे तक्रार दिली की, दि.२४/१०/२०२१ रोजी भारत विरुध्द पाकिस्तान हा टि-२० क्रिकेट सामना खेळला गेला. क्रिकेट सामन्यात भारताचे कर्णधार विराट कोहली हे होते. सदर सामान्यात भारताचा पराभव झाला. पराभवानंतर सोशल मिडियावरएका ट्विटर धारकाने विराट कोहली यांची १० महिन्याची मुलीबाबत आक्षेपार्ह ट्विट प्रसारीत केले. सदर ट्विटचे स्क्रिनशॉट मोठयाप्रमाणात व्हॉटसअॅप व इतर सोशल मिडीयावर प्रसारीत झालेले आहेत.

@criccrazyygirl या ट्विटर अकांउट धारकाने दिनांक २४/१०/२०२१ रोजी भारत विरुध्द पाकिस्तान सामन्यानंतर विराट कोहली यांची १० महिन्याची मुलीबाबत आक्षेपार्ह ट्विट करून ते ट्विटर या सोशल मिडीयावरून सार्वजनिकरित्या प्रसारीत केले. समाजातील प्रतिष्ठीत भारतीय क्रिकेट टिमचे कर्णधार विराट कोहली व सिने कलाकार अनुष्का शर्मा यांच्या १० महिन्याच्या लहान मुलीबाबत आक्षेपार्ह ट्विट सार्वजनिकरित्या प्रसारीत करून एकुणच स्त्री मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करुन लहान मुलगी व तिच्या पालकांची बदनामी केलेली आहे. त्यानुसार पश्चिम प्रादेशिक सायबर पोलीस ठाणे गु.र.क्र. ४९/२०२१, कलम ३५४(अ),५०६,५०० भा.दं. वि. सह कलम ६७, ६७(ब) माहिती तंत्रज्ञान कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नमुद गुन्हयात केलेल्या तांत्रीक तपासामध्ये गुन्हयातील आरोपी हा रंगारेड्डी, हैद्राबाद या ठिकाणी असल्याची माहीती प्राप्त झाली. त्यानुसार नमुद ठिकाणी पश्चिम प्रादेशिक सायबर पोलीस ठाणे येथील पोलीस पथक पाठवून सदर ठिकाणाहून अकुबथिनी रामनागेश, वय २३ वर्षे यास चौकशीकामी ताब्यात घेवून त्यास पश्चिम प्रादेशिक सायबर पोलीस ठाणे येथे पुढील योग्य त्या कायदेशीर कार्यवाहीकरिता आणण्यात येत आहे.

सदरची यशस्वी कारवाई मा. सह पोलीस आयुक्त, गुन्हे श्री. मिलींद भारंबे, मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. एस. विरेश प्रभु, मा. पोलीस उप-आयुक्त, सायबर गुन्हे, डॉ. रश्मी करंदीकर, मा. सहा.पो.आयुक्त, सायबर नितीन जाधव, प्रभारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक मंगेश मजगर यांच्या मार्गदर्शनाखाली पो.उप.नि. सचिन मांडोळे, पोउपनि विजय वगरे, पोउपनि भोजणे पोहवा वारे, पोना सावंत, पो.ना. भुवड, पोशि पडळकर यांनी पार पाडली.